खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२१ – २२

## संस्थाचालक शिक्षण मंडळ सभा

सकाळ

# शिक्षण संस्थाचालकांची भूमिका महत्त्वाची

## राजगुरुनगर येथील आयोजित सभेत अध्यक्ष विजय कोलते यांचे प्रतिपादन

**राजगुरुनगर, ता. ८ :** "विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शैक्षणिक संस्थाचालकांची भूमिका महत्त्वाची असून, संस्थाचालक शिक्षण मंडळ (पुणे ग्रामीण) या संस्थेच्या माध्यमातूनगुणवत्ताधारित विद्यार्थी घडवण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहणार आहे," असे प्रतिपादन या संस्थेचे अध्यक्ष विजय कोलते यांनी केले.

राजगुरुनगर (ता. खेड) येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुक्यातील सर्व शैक्षणिक संस्थाचालकांच्या नुकत्याच झालेल्या सभेत कोलते बोलत होते. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्षॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, लक्ष्मण टोपे, महेश ढमढेरे, शिवाजी घोगरे, शांताराम पोमण, अजित लुणावत, डॉ. प्रदीप शेवाळे, प्रा. शिवाजी पिंगळे, लक्ष्मण खंडागळे, नंदकुमार शिवेकर, बबन शिवले, श्रीकांत पोटवडे,प्राचार्य डॉ. किरण शिंदे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रबंधक कैलास पाचारणे आदी उपस्थित होते.

कोलते म्हणाले, "बदलत्या काळातील शैक्षणिक संस्थांसमोरील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी संस्थाचालकांनी तयार राहावे. आपापल्या शैक्षणिक संस्थांमधील ग्रंथालय, जिमखाना, प्रयोगशाळा आदी भौतिक सुविधांनी सुसज्ज करणे,शासन परिपत्रक, शासकीय नियमांची वेळोवेळी माहिती घेणे, मूल्यशिक्षणाला प्राधान्य देणारे अभ्यासक्रम राबविणे आवश्यक आहे."

खेड तालुक्यातील सर्व औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांनी त्यांचा सामाजिक दायित्व निधी (सीएसआर) तालुक्यातील शैक्षणिक संस्थांना प्राधान्याने देऊनत्यांचा भौतिकदृष्ट्या विकास करण्याचे आवाहन ॲड. बुट्टे पाटील यांनी केले. त्यासाठी ज्येष्ठ नेते शरद पवार यांना २५ डिसेंबरला निवेदन देणार असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.

Pune, District-Today
09/12/2021 Page No. 4

# ‘त्यात’ संस्थाचालकांची भूमिका महत्त्वाची

## हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील सभेत विजय कोलते यांचे प्रतिपादन

**राजगुरूनगर, दि. ७ (प्रतिनिधी)** - विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शैक्षणिक संस्थाचालकांची भूमिका महत्त्वाची असून संस्थाचालक शिक्षण मंडळ पुणे ग्रामीण या संस्थेच्या माध्यमातून गुणवत्ताधारित विद्यार्थी घडवण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहणार असल्याचे प्रतिपादन या संस्थेचे अध्यक्ष विजय कोलते यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुक्यातील सर्व शैक्षणिक संस्थाचालकांच्या सभेत कोलते बोलत होते. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, लक्ष्मणराव टोपे, शिवाजी घोगरे, शांताराम पोमण यांसह खेड तालुक्यातील अनेक शैक्षणिक संस्थाचालक उपस्थित होते.



**राजगुरूनगर : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित सभेसाठी उपस्थितीत सर्व शैक्षणिक संस्थाचालक.**

विजय कोलते म्हणाले की, बदलत्या काळातील शैक्षणिक संस्थांसमोरील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी संस्थाचालकांनी तयार रहावे. आपापल्या शैक्षणिक संस्थांमधील ग्रंथालय, जीमखाना, प्रयोगशाळा आदि भौतिक सुविधांनी सुसज्ज करणे, शासन परिपत्रक, शासकीय नियमांची वेळोवेळी माहिती घेणे, मूल्यशिक्षणाला प्राधान्य देणारे अभ्यासक्रम राबविणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. महेश ढमढेरे, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, अजित लूणावत डॉ. प्रदीप शेवाळे, प्रा. शिवाजी पिंगळे, लक्ष्मण खंडागळे, नंदकुमार शिवेकर, बबन शिवले, श्रीकांत पोटवडे, प्राचार्य डॉ. किरण शिंदे, प्राचार्य डॉ.एच. एम. जरे, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, प्रबंधक कैलास पाचारणे आदि विविध शैक्षणिक संस्थांतील प्रतिनिधींनी चर्चेत सहभाग घेतला. सूत्रसंचालन करून डॉ. संजय शिंदे यांनी आभार मानले.

> “ खेड तालुक्यातील सर्व शैक्षणिक संस्थांचे प्रश्न आणि कंपन्यांचा सामाजिक दायित्व निधी तालुक्यातील शैक्षणिक संस्थांना मिळावा यासाठीचे निवेदन शरद पवर यांना २५ डिसेंबरला देणार आहे.
>
> – **देवेंद्र बुट्टे पाटील**, अध्यक्ष, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ

प्रभात Wed, 08 December 2021
https://epaper.eprabhat.net/c/64826760

पुढारी

# संस्थाचालकांची भूमिका महत्त्वाची : कोलते

## राजगुरू महाविद्लायलात सभा

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शैक्षणिक संस्थाचालकांची भूमिका महत्त्वाची आहे. संस्थाचालक शिक्षण मंडळ पुणे ग्रामीण या संस्थेच्या माध्यमातून गुणवत्ताधारित विद्यार्थी घडविण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहणार असल्याचे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष विजय कोलते यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुक्यातील सर्व शैक्षणिक संस्थाचालकांच्या सभेत बुधवारी (दि. १) बोलत होते. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, लक्ष्मणराव टोपे, महेशबापू ढमढेरे, शिवाजी घोगरे, शांताराम पोमण आदी उपस्थित होते. कोलते यांनी नव्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी संस्थाचालकांनी तयार राहण्याचे आवाहन केले. संस्था ग्रंथालय, जिमखाना, प्रयोगशाळा आदी भौतिक सुविधांनी सुसज्ज करणे, शासन परिपत्रक, शासकीय नियमांची वेळोवेळी माहिती घेणे, मूल्यशिक्षणाला प्राधान्य देणारे अभ्यासक्रम राबविणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी खेड तालुक्यातील सर्व औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांनी त्यांचा सामाजिक दायित्व निधी (सीएसआर) तालुक्यातील शैक्षणिक संस्थांना प्राधान्याने देण्याचे आवाहन केले. महेशबापू ढमढेरे, नानासाहेब टाकळकर, अजित लुणावत, डॉ. प्रदीप शेवाळे, प्रा. शिवाजी पिंगळे, लक्ष्मण खंडागळे, नंदकुमार शिवेकर, बबन शिवले, श्रीकांत पोटवडे, प्राचार्य डॉ. किरण शिंदे आदींनी चर्चेत सहभाग घेतला. डॉ. संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.



**हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुक्यातील सर्व शैक्षणिक संस्थाचालकांच्या सभेसाठी उपस्थित मान्यवर.**

My Gramin Edition
Dec 4, 2021 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

नवराष्ट्र

# संस्थाचालकांची भूमिका महत्त्वाची

**राजगुरुनगर,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शैक्षणिक संस्थाचालकांची भूमिका महत्त्वाची असून शिक्षण मंडळ पुणे ग्रामीण या संस्थेच्या माध्यमातून गुणवत्ताधारित विद्यार्थी घडवण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहणार असल्याचे प्रतिपादन या संस्थेचे अध्यक्ष विजय कोलते यांनी केले. ते राजगुरुनगर (ता. खेड) येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुक्यातील सर्व शैक्षणिक संस्थाचालकांच्या सभेत बोलत होते. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष प्रताप टाकळकर, लक्ष्मण टोपे, महेश ढमढेरे, शिवाजी घोगरे, शांताराम पोमण यांच्यासह अनेक शैक्षणिक संस्थाचालक उपस्थित होते.



## विजय कोलते यांचे मत

## २५ डिसेंबरला देणार निवेदन



संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी खेड तालुक्यातील सर्व औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांनी त्यांचा सामाजिक दायित्व निधी (सीएसआर) तालुक्यातील शैक्षणिक संस्थांना प्राधान्याने देऊन त्यांचा भौतिकदृष्ट्या विकास करण्याचे आवाहन केले. तालुक्यातील सर्व शैक्षणिक संस्थांचे प्रश्न आणि कंपन्यांचा सामाजिक दायित्व निधी तालुक्यातील शैक्षणिक संस्थांना मिळावा यासाठीचे निवेदन पवार साहेबांना २५ डिसेंबरला देणार असल्याचे ते म्हणाले. महेश ढमढेरे, प्रताप टाकळकर, अजित लूणावत डॉ. प्रदीप शेवाळे, प्रा. शिवाजी पिंगळे, लक्ष्मण खंडागळे, नंदकुमार शिवेकर, बबन शिवले, श्रीकांत पोटवडे, प्राचार्य डॉ. किरण शिंदे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रबंधक कैलास पाचारणे आदींनी चर्चेत सहभाग घेतला. प्रास्ताविक व स्वागत ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले. सूत्रसंचालन व आभार उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी मानले.

Pune Plus Edition
04 December 2021 Page No. 2
epaper.navarashtra.com

लोकमत

# गुणवत्ताधारित विद्यार्थी घडवण्यासाठी प्रयत्नशील : कोलते

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शैक्षणिक संस्थाचालकांची भूमिका महत्त्वाची असून संस्थाचालक शिक्षण मंडळ पुणे ग्रामीण या संस्थेच्या माध्यमातून गुणवत्ताधारित विद्यार्थी घडवण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहणार असल्याचे प्रतिपादन या संस्थेचे अध्यक्ष विजय कोलते यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुक्यातील सर्व शैक्षणिक संस्थाचालकांच्या सभेत ते बोलत होते.

याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, लक्ष्मणराव टोपे, महेश ढमढेरे, शिवाजी घोगरे, शांताराम पोमण यांसह खेड तालुक्यातील अनेक शैक्षणिक संस्थाचालक उपस्थित होते.

विजय कोलते यांनी बदलत्या काळातील शैक्षणिक संस्थांसमोरील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी संस्थाचालकांनी तयार करण्याचे आवाहन केले.

आपापल्या शैक्षणिक संस्थांमधील ग्रंथालय, जिमखाना, प्रयोगशाळा आदी भौतिक सुविधांनी सुसज्ज करणे, शासन परिपत्रक, शासकीय नियमांची वेळोवेळी माहिती घेणे, मूल्यशिक्षणाला प्राधान्य देणारे अभ्यासक्रम राबविणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. खेड तालुक्यातील सर्व शैक्षणिक संस्थांनी संस्थाचालक शिक्षण मंडळाचे सभासद होण्याचे आवाहन त्यांनी केले.

संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांनी खेड तालुक्यातील सर्व औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांनी त्यांचा सामाजिक दायित्व निधी (सीएसआर) तालुक्यातील शैक्षणिक संस्थांना प्राधान्याने देऊन त्यांचा भौतिकदृष्ट्या विकास करण्याचे आवाहन केले.

तालुक्यातील सर्व शैक्षणिक संस्थांचे प्रश्न आणि कंपन्यांचा सामाजिक दायित्व निधी तालुक्यातील शैक्षणिक संस्थांना मिळवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या सभेत महेशबापू ढमढेरे, नानासाहेब टाकळकर, अजित लूणावत, डॉ. प्रदीप शेवाळे, प्रा. शिवाजी पिंगळे, लक्ष्मण खंडागळे, नंदकुमार शिवेकर, बबन शिवले, श्रीकांत पोटवडे, प्राचार्य डॉ. किरण शिंदे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्राचार्य डॉ. व्ही.डी. कुलकर्णी, प्रबंधक कैलास पाचारणे आदी विविध शैक्षणिक संस्थांतील प्रतिनिधींनी चर्चेत सहभाग घेतला.

Hello Pune Gramin
Page No. 8 Dec 03, 2021
Powered by: erelego.com

HRM

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
गांवकरी

# गुणवत्ताधारित विद्यार्थी घडवण्यासाठी प्रयत्नशील : विजय कोलते

राजगुरुनगर
गांवकरी प्रतिनिधी

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शैक्षणिक संस्थाचालकांची भूमिका महत्त्वाची असून संस्थाचालक शिक्षण मंडळ पुणे ग्रामीण या संघटनेच्या माध्यमातून गुणवत्ताधारित विद्यार्थी घडवण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणार असल्याचे प्रतिपादन या संघटनेचे अध्यक्ष विजय कोलते यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुक्यातील सर्व शैक्षणिक संस्थाचालकांच्या सभेत बोलत होते.



याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, लक्ष्मण टोपे, महेश ढमढेरे, शिवाजी घोगरे, शांताराम घोमल यांच्यासह खेड तालुक्यातील अनेक शैक्षणिक संस्थाचालक उपस्थित होते.

विजय कोलते यांनी आगामी काळातील शैक्षणिक संस्थांसमोरील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी संस्थाचालकांनी तयारी करण्याचे आवाहन केले. आपापल्या शैक्षणिक संस्थांमधील ग्रंथालय, जीमखाना, प्रयोगशाळा विविध भौतिक सुविधांनी सुसज्ज करणे, शासन परिपत्रक, शासकीय नियमांची वेळोवेळी माहिती घेणे, मूल्यशिक्षणाला प्राधान्य देणारे अभ्यासक्रम राबविणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. खेड तालुक्यातील सर्व शैक्षणिक संस्थांनी संस्थाचालक शिक्षण मंडळाचे सभासद होण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी खेड तालुक्यातील सर्व औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांनी त्यांचा सामाजिक दायित्व निधी (सीएसआर फंड) तालुक्यातील शैक्षणिक संस्थांना प्राधान्याने देऊन त्यांचा भौतिकदृष्ट्या विकास करण्याचे आवाहन केले. तालुक्यातील सर्व शैक्षणिक संस्थांचे प्रश्न आणि कंपन्यांचा सामाजिक दायित्व निधी तालुक्यातील शैक्षणिक संस्थांना मिळावा यासाठीचे निवेदन पवार साहेबांना येत्या २५ डिसेंबरला देणार असल्याचे ते म्हणाले.

या सभेत महेश ढमढेरे, नानासाहेब टाकळकर, अजित लुणावत डॉ. प्रदीप शेवाळे, प्रा. शिवाजी शिंदे, लक्ष्मण खंडागळे, नंदकुमार शिवेकर, बबन शिवले, श्रीकांत घोटवडे, प्राचार्य डॉ. किरण शिंदे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्राचार्य डॉ. जी. डी. कुलकर्णी, प्रबंधक कैलास पाचारणे आदि विविध शैक्षणिक संस्थांतील प्रतिनिधींनी चर्चेत सहभाग घेतला.

सभेचे प्रास्ताविक व स्वागत ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी तर सूत्रसंचालन व आभार डॉ. संजय शिंदे यांनी मानले.

HRM

वर्ष : १४०
Regd.No. PCW/002/2018-2020-S.P.College Post-RNI No. 1755/57
केसरी
राष्ट्रीय ठेवा

## 'गुणवत्ताधारित विद्यार्थी घडवण्यासाठी प्रयत्नशील'

**राजगुरूनगर, (वार्ताहर) :** विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शैक्षणिक संस्थाचालकांची भूमिका महत्त्वाची असून, संस्थाचालक शिक्षण मंडळ पुणे ग्रामीण या संस्थेच्या माध्यमातून गुणवत्ताधारित विद्यार्थी घडवण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहणार असल्याचे प्रतिपादन या संस्थेचे अध्यक्ष विजय कोलते यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात खेड तालुक्यातील सर्व शैक्षणिक संस्थाचालकांच्या सभेत ते बोलत होते. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, लक्ष्मण टोपे, महेश ढमढेरे, शिवाजी घोगरे, शांताराम पोमण यांसह खेड तालुक्यातील अनेक शैक्षणिक संस्थाचालक उपस्थित होते. या सभेत महेश ढमढेरे, नानासाहेब टाकळकर, अजित लूणावत डॉ. प्रदीप शेवाळे, प्रा. शिवाजी पिंगळे, लक्ष्मण खंडागळे, नंदकुमार शिवेकर, बबन शिवले, श्रीकांत पोटवडे, प्राचार्य डॉ. किरण शिंदे, डॉ. एच. एम. जरे, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, कैलास पाचारणे आदि विविध शैक्षणिक संस्थांतील प्रतिनिधींनी चर्चेत सहभाग घेतला.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**